दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ८५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०७ नोव्हेंबर २०२४







## ‘मविआ’चं सरकार आल्यास ३ लाखांपर्यंत शेतकऱ्यांचं कर्ज माफ करणार

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०६, मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरु आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीचा प्रचार जोरात सुरु आहे. राज्यभरात विविध मतदारसंघात आघाडी आणि युतीसह इतर पक्षांच्या नेत्यांच्या सभांचा धडाका सुरु आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या पार्श्वभूमीवर आज मुंबईत महाविकास आघाडीची सभा पार पडली.

या सभेला काँग्रेस नेते राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासह इंडिया आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित होते. या सभेत महाविकास आघाडीकडून महाराष्ट्रासाठी पाच गॅरंटी देण्यात आल्या. यामध्ये शरद पवार यांनी सभेत बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत भाष्य केलं. राज्यात ‘मविआ’चं सरकार आल्यास ३ लाखांपर्यंतचं शेतकऱ्यांचं कर्ज माफ करणार, असं मोठं आश्वासन शरद पवार यांनी यावेळी दिलं.



**शरद पवार काय म्हणाले?**

लोकसभेच्या निवडणुकीवेळी लोकांनी महाविकास आघाडीला शक्ती देण्याचं काम केलं. राज्यातील महाविकास आघाडीची सत्ता गेल्यानंतर देशात विकासाच्या बाबतीत आपलं राज्य ६ नंबरवर गेलं. महाराष्ट्र राज्य एकेकाळी कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत एक नंबरचं राज्य होतं. मात्र, आज राज्यात अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. राज्यात जवळपास ६४ हजार महिला आणि मुली बेपत्ता आहेत. आधी महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतीत प्रगत राज्य होतं. मात्र, आता शिक्षणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्र राज्य मागे गेलं आहे, असं म्हणत शरद पवारांनी महायुतीवर हल्लाबोल केला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा काही दिवसांपूर्वी कोसळला. त्या पुतळ्याचं अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं होतं. त्यानंतर सरकारच्यावतीने सांगण्यात आलं की त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वारा आला आणि पुतळा कोसळला. मुंबईमधील पुतळे वाऱ्याने कोसळत नाहीत. याचं कारण इकडे भ्रष्टाचार नव्हता. पण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. भ्रष्टाचाराचा विक्रम या भाजपाच्या लोकांनी केला, असा हल्लाबोल शरद पवारांनी महायुतीवर केला.

आज आम्ही पाच गॅरंटी सांगितल्या आहेत. त्यामध्ये आम्ही कृषी संदर्भातील गॅरंटी देत आहोत. केंद्रात मनमोहन सिंह यांचं सरकार आसताना आम्ही शेतकऱ्यांना मोठी सवलत दिली होती. आता देखील आमच्या महाविकास आघाडीच्यावतीने मी आपल्याला सांगतो की, तुम्ही लोकांनी महाराष्ट्राची सत्ता महाविकास आघाडीच्या हातात दिल्यानंतर कृषी संदर्भात योजना राबवली जाईल. या योजनेमध्ये शेतकऱ्यांचं ३ लाख रुपयांपर्यंतच कर्ज माफ केलं जाईल. तसेच जो नियमित कर्जफेड करतो, त्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहन अनुदान दिलं जाईल, असं मोठं आश्वासन शरद पवार यांनी या सभेत बोलताना दिलं.

## महाविकास आघाडीचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात...

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०६, पुणे :** राज्यातील महिला वर्गासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणल्यानंतर महाविकास आघाडीतील नेत्यांनी या योजनेबाबत अनेक मुद्दे उपस्थित करीत महायुतीमधील नेत्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.


यावरून दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले. तर आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान देखील सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांकडून हा मुद्दा उपस्थित केला जात असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घोषणा पत्र जाहीर केले आहे. त्यामध्ये महायुतीचं सरकार आल्यावर लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना १५०० ऐवजी २१०० रुपये दिले जातील अशी घोषणा केली आहे. या घोषणेची आज दिवसभर राजकीय वर्तुळात चर्चा ऐकण्यास मिळाली. त्या सर्व घडामोडी दरम्यान आज भाजपाचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यातील पर्वती विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार आणि विद्यमान आमदार माधुरी मिसाळ यांच्या प्रचारार्थ आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून महाविकास आघाडीतील नेत्यांनी केलेल्या टीकेचा समाचार घेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजना अंमलात आणली त्यावेळेस आमच्यावर मोठ्या प्रमाणात टीका करून योजना फसवी असल्याचे सांगण्यात आले.



मात्र या योजनेच्या राज्यातील अडीच कोटी महिला लाभार्थी ठरल्या आहेत. त्या सर्व महिलांच्या खात्यात आतापर्यंत पैसे जमा झाले आहेत. तसेच महाविकास आघाडीचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात असून त्यांनी न्यायालयात देखील दाद मागून योजना म्हणजे पैशाचा चुराडा असल्याचे सांगितले. पण आम्ही योजना बंद होऊ दिली नाही आणि भविष्यात देखील लाडकी बहीण योजना बंद करणार नसल्याचे सांगत विरोधकांना चांगलेच सुनावले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार पंकजा मुंडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय शिवतारे, अमित गोरखे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## अपक्ष अर्ज भरल्यामुळे भाजपाकडून वरून पाटील ६ वर्षासाठी निलंबित

**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.०६, कल्याण (ठाणे) :** १३८ कल्याण पश्चिम विधानसभा मध्ये महायुतीच्या विरोधात या मतदारसंघातून वरूण सदाशिव पाटील यांनी अपक्ष अर्ज भरल्याने पक्षशिस्तीचा भंग केल्याप्रकरणी त्यामुळे त्यांना पक्षातून ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टीचे कल्याण जिल्हा अध्यक्ष नरेंद्र (नाना) सूर्यवंशी याप्रकरणी आदेश जारी करत तात्काळ लागू करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्याविरोधात बंडखोरी केल्याप्रकरणी भाजप पक्षश्रेष्ठींनी वरुण पाटील यांच्यावर ६ वर्षांसाठी निलंबनाची कारवाई केली आहे.


भारतीय जनता पार्टी
कल्याण जिल्हा अध्यक्ष: श्री नरेंद्र (नाना) सूर्यवंशी

5 नोवेम्बर 2024

प्रेस नोट

सस्नेह नमस्कार,

१३८ कल्याण पश्चिम विधानसभा मध्ये महायुतीच्या विरोधात या मतदार संघातून खालील नमूद व्यक्तींनी अपक्ष अर्ज भरल्याने पक्षशिस्तीचा भंग केलेला आहे त्यामुळे त्यामुळे त्यांना पक्षातून ६ (सहा) वर्षांसाठी निलंबित करण्यात येत आहे.

| क्रं | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. वरून सदाशिव पाटील | मंडल अध्यक्ष, कल्याण पश्चिम |

हा निर्णय तात्काळ लागू करण्यात येत आहे.

आपला,

नरेंद्र (नाना) सूर्यवंशी

## एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही : राज ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०६, अमरावती :** आम्ही हिंदू म्हणून कधी एकत्रितपणे विचार करीत नाही. हिंदू फक्त दंगलीच्या वेळी असतो. नंतर तो स्वतः:च्या जातीचा होतो. आजच्या राजकीय लोकांना तेच हवे आहे. आता काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाला एकगठ्ठा मतदान करा, असे फतवे मुस्लीम मौलवींकडून काढले जात आहेत. आम्ही मात्र अजूनही विखुरलेले आहोत. मुस्लिमांच्या मतांसाठी बुळबुळीत सरकारे ठोस भूमिका घेताना दिसत नाहीत. पण, तुम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली, तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी केले आहे. अमरावतीचे मनसेचे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी रात्री येथील सायन्सस्कोर मैदानावर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. राज ठाकरे म्हणाले, मशिदींवरचे भोंगे बंद झाले नाही, तर मशिदीसमोर हनुमान चालिसा पठण करण्याचा इशारा मनसेने दिला होता. त्यावेळी उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री होते. आम्ही आंदोलन केल्यानंतर भोंगे बंद झाले होते. पण, त्यावेळी मनसेच्या १७ हजार कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते. ही कुणाची माणसे आहेत. कुणाला जपताहेत. मुंबईत समुद्रात अनधिकृतपणे एक मजार बांधण्यात येत होती. आम्ही ते उघड करताच एका रात्रीत ती पाडण्यात आली. हिंमत कशी होते, या लोकांची. हे लोक रस्त्यावर येऊन नमाज पठण करतात. मुस्लिमांनी त्यांचा धर्म घरात ठेवावा. तो उंबरठा ओलांडून बाहेर यायला नको. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.




ते म्हणाले, उद्धव ठाकरेंचा विषय आधीच आटोपलेला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीचे लोक दुखावले जाऊ नयेत, म्हणून उद्धव ठाकरे हे स्वतः:च्या वडिलांच्या नावासमोरील हिंदूहृदयसम्राट हे बिरूद काढून टाकतात. मग उरले काय. ही मंडळी त्यांच्यासाठी काम करणार. सगळे त्यांच्यासाठी. मग तुमच्यासाठी उरले काय, असा सवाल राज ठाकरे यांनी केला.नवनीत राणा यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मुस्लिमांनी रस्त्यावर येऊन जल्लोष केला. पाकिस्तानचे झेंडे नाचवत उत्सव साजरा केला. आम्हाला त्याचे काहीच वाटत नाही. आम्ही बाहेरून किती वेळ काम करायचे. एकवेळ सत्ता द्या, नाही सडकून काढले, तर म्हणा. परत यांची हिंमत होणार नाही, असे राज ठाकरे म्हणाले.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पैशांचा महापूर !

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०६, अमरावती :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी मोर्शीत ११ लाख ३६ हजार ८०० रुपये, परतवाड्यात ८ लाख रुपये तर चांदूर रेल्वेत १ लाख ४२ हजार २४० रुपयांची रोकड जप्त केली. गेल्या चोवीस तासांत कारवाई करताना पोलिसांना ही रोख रक्कम सापडली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांकडून पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात प्रभावी गस्त सुरू आहे. अशात मंगळवारी रात्री मोर्शी ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असलेल्या पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या नेतृत्वातील पथकाला मतदारांना वाटप करण्यासाठी एका चारचाकी वाहनातून मोठ्या प्रमाणात रोकड नेण्यात येत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारावर पथकाने सिंभोरा चौकात सापळा रचून संशयास्पद चारचाकी वाहन थांबवून तपासणी केली. तपासणीत वाहनात ११ लाख ३६ हजार ८०० रुपयांची रोकड आढळून आली. वाहनातील व्यक्तीला रोकडबाबत विचारणा करण्यात आल्यावर तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. त्यामुळे पथकाने रोकड जप्त केली. याबाबत आयकर विभागालासुद्धा माहिती देण्यात आली. त्याचवेळी परतवाडा ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असलेल्या साहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वातील पथकाने मंगळवारी एका दालमिलजवळ संशयास्पद दुचाकीस्वाराला थांबवून तपासणी केली.

त्यावेळी त्याच्या दुचाकीवरील पिशवीत ८ लाखांची रोकड आढळून आली. दुचाकीस्वाराजवळ रोकडबाबत कुठलेही कागदपत्र मिळून न आल्याने ती जप्त करण्यात आली.




# संपादकीय



## विद्यार्थी दिन...

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

## महावितरणाच्या ढिसाळ कारभारामुळे बकरी मृत्युमुखी

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०६, हदगांव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मौजे कवाना तालुका हादगाव जिल्हा नांदेड येथील रहिवाशी बकरी चालक भीमराव पुंजाजी प्रधान व्यवसाय शेळ्या चारणे असा त्यांचा व्यवसाय आहे. परंतु महावितरणाच्या ढिसाळ कारभारामुळे व लाइनमेनच्या दादागिरीमुळे त्यांची गाभण बकरी ही करंटचे ताराला चिटकून मृत्युमुखी पडली. लाईनमन यांना वारंवार सांगून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष केल्याचे गावकऱ्या कडून बोलले जात आहे.

सदरील परिस्थिती पाहता सुदैवाने मनवाची जीवित हानी झालेली नाही. परंतु भविष्यात अशा मुजोर अधिकाऱ्याकडून जर सर्वसामान्य माणसाला त्रास होत असेल तर गावकऱ्यांनी कुणाकडे जायचं हा मोठा प्रश्न कवाना गावांमध्ये उद्भवत आहे. बघूया प्रशासन या गरीब मजुराला न्याय देण्याचे काम करते की नाही. याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

# कर्करोगाचं निदान करा, हयगय नको !!

**- प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

जागतिक कर्करोग दिन हा ४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. तसेच जागतिक समुदायाला शिक्षण सुधारण्यासाठी आणि कर्करोगाविरूद्धच्या लढ्यात वैयक्तिक, सामूहिक आणि सरकारी कृती प्रज्वलित करतो. जागतिक कर्करोग दिन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या मार्गदर्शनाने साजरा केला जातो. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे हे आहे. तसेच कर्करोगापासून बचाव करता येण्याजोग्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संकल्पना आहे असे मानले जाते.

जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहिती विरोधात जनजागृती करतो, जागरूकता वाढवतो आणि हानी कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापैकीची एक चळवळ म्हणजे छेक्ष्ळअॅडशश्रषळश असून, यात लोकांनी स्वतःचे डोके मुंडन करून किंवा तशी आभासी प्रतिमा निर्माण करून ती सोशल मीडियावर प्रगट करण्याची जागतिक चळवळ आहे. याद्वारे कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी एक प्रकारे मानसिक पाठिंबा दर्शविण्याची ही एक कृती आहे. अशा प्रकारचे जगभरात शेकडो कार्यक्रम घेतले जातात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. जागतिक कर्करोग दिनाचा परिचय हा पॅरिस चार्टरचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो कर्करोग



संशोधन, प्रतिबंध, रूग्णांची काळजी, जागरूकता आणि जगभरात एकत्रीकरणाचाही प्रयत्न करतो. संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रुग्ण सेवा सुधारण्यासाठी पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद तयार करण्यात आली होती. त्यामध्ये जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, ज्यावर तत्कालीन युनेस्कोचे संचालक, कोचिरो मत्सुरा आणि तत्कालीन फ्रान्सचे अध्यक्ष जॅक शिराक ४ फ ेब्रुवारी २००० रोजी पॅरिसमध्ये या समिटमध्ये स्वाक्षरी केली होती.

सोप्या भाषेत सांगायचे तर, कर्करोग हा जगातील प्रमुख मारकांपैकी एक आहे. केवळ या वर्षी, जवळजवळ ९.६ दशलक्ष लोक कर्करोगाने मरतील आणि त्यावर नियंत्रण न ठेवता, २०३० पर्यंत दरवर्षी मृत्यूची संख्या १३.२ दशलक्षपर्यंत वाढेल. प्रतिबंध, शोध आणि उपचार कार्यक्रमांसाठी वाढीव सरकारी मदत आणि निधीमुळे यापैकी बरेच मृत्यू टाळले जाऊ शकतात. कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराला तोंड देण्यासाठी व्यावहारिक धोरणे विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत तर लाखो लोक मरत राहतील. दुर्दैवाने, कॅन्सरमध्ये सर्वात जास्त वाढ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होण्याचा अंदाज आहे, जे रोगाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा सामना करण्यास सर्वात कमी सज्ज आहेत. या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि कर्करोगाचे ओझे कमी करण्यासाठी व्यावहारिक रणनीती विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची गरज आहे. जागतिक कर्करोग दिन हा शब्द पसरवण्याची आणि आंतरराष्ट्रीय मीडिया आणि जागतिक आरोग्य आणि विकास कार्यक्रमांमध्ये या रोगाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्याची योग्य संधी आहे.

जागतिक कर्करोग दिन रन फॉर ए क्युअर आफ्रिकाची आठवण करून देतो की कर्करोग ही जागतिक आणीबाणी आहे आणि आपण प्रत्येकजण या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली भूमिका कशी बजावतो. रन फॉर ए क्युअर आफ्रिकाहा वकिलांच्या मोठ्या समुदायाचा एक भाग कसा आहे, याची साक्ष देणे, आमच्या कार्याला असेच देते. खूप अर्थ आणि आम्हाला कृती करण्यास प्रेरित करते. कर्करोग अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे विकसित होतात आणि शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतात. जागतिक स्तरावर, कर्करोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे, २०२० मध्ये एक कोटीपेक्षा जास्त मृत्यूचे कारण आहे. भारतात, २०२२ मध्ये अंदाजित १९ ते २० लाख प्रकरणे आढळून आली आहेत. तंबाखूचा वापर, दीर्घकाळ मद्यपान, अस्वस्थ अन्न सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि वायू प्रदूषणाच्या संपर्कात येणे हे सर्व कर्करोगाच्या धोक्याचे घटक आहेत. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना अनेक जुनाट आजारांमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या जोखमीला तोंड देण्याचे अनोखे आव्हान आहे. या व्यतिरिक्त या राष्ट्रांनी शिक्षणाचा अभाव, विलंब निदान आणि स्वस्त उपचारांसाठी कमी प्रवेश यामुळे कर्करोगाचे खराब निदान दर्शविले होते. विकसनशील देशांमध्येही, कर्करोगाबाबत जागरूकता नसल्यामुळे निदानास विलंब होतो. २०२० मध्ये नोंदवलेला एक अभ्यास, भारतातील चार प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता, जेथे कर्करोगाचे बहुसंख्य रुग्ण त्यांच्या प्रगत अवस्थेत असतानाच प्रथमच उपचार घेतात. साक्षरता दर आणि कमी उत्पन्नाचा कर्करोग जागरूकतेवर खूप प्रभाव पडतो. भारतात, उच्च उत्पन्न आणि साक्षरता पातळी असलेले लोक इतरांपेक्षा कर्करोगाविषयी अधिक जागरूक होते.

निष्कर्षापर्यंत, भारतीय आणि जागतिक लोकसंख्येमध्ये कर्करोगाची तपासणी, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल सामान्य जागरूकता कमी आहे, विशेषत: कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ज्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि ती भरून काढण्याची तातडीची गरज आहे. योग्य शिक्षणासह कमतरता. जागतिक कर्करोग दिन कर्करोग टाळण्यासाठी, तो लवकर शोधणे आणि उपचार करणे किती महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधतो. कर्करोगाचे अनेक प्रकार टाळता येत नसले तरी, काही लोक निरोगी जीवनशैली जगत असले तरीही त्यांना कर्करोगाचे निदान केले जाईल. कर्करोगाचा धोका अनेक मार्गांनी कमी केला जाऊ शकतो. यासह फळे आणि भाज्या जास्त आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आणि लाल मांस कमी असलेले पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम आणि निरोगी वजन राखणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरापासून दूर राहणे

**किमान अल्कोहोल सेवन**

अतिनील किरणांपासून सावधगिरी बाळगण्यामध्ये सनस्क्रीन वापरणे आणि संरक्षणात्मक कपडे घालणे समाविष्ट आहे. तसेच शिफारस केलेल्या कर्करोगाच्या तपासणीमध्ये नियमितपणे सहभागी होणे, पर्यावरणातील हानिकारक रसायनांचा संपर्क टाळणे, ह्युमन पॅपिलोम ाव्हायरस विरुद्ध लसीकरण ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची थीम आहे केअर गॅप बंद करा, जी २०२२ थीमची निरंतरता आहे आणि प्रत्येक वर्षासाठी निर्दिष्ट उद्दिष्टांसह ३ वर्षांची मोहीम चालेल. बहु-वर्षीय मोहिमेमध्ये अधिक एक्सपोजर आणि प्रतिबद्धता, तसेच जागतिक जागरूकता वाढवण्याच्या आणि प्रभाव पाडण्याच्या अधिक संधी मिळतील अशी अपेक्षा होती. एकत्रितपणे आम्ही सत्तेत असलेल्यांना आव्हान देतो. अंतिम वर्ष कर्करोगाच्या प्राधान्याबाबत उच्च अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, असमानतेचा सामना करण्यासाठी सर्जनशील धोरणे विकसित करणे आणि न्याय्य आणि कर्करोगमुक्त जग निर्माण करण्यासाठी संसाधनांचे वाटप करण्यावर भर देतो.

## विकासाचे शिलेदार होण्यासाठी बुथप्रमुखांनी साथ घ्यावी - बाळासाहेब खिलारी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर विधानसभे अंतर्गत पारनेर तालुक्यात सर्वाधिक विकास कामे झाली आहेत. विकासाची ही गती कायम राखत प्रगती करण्याची संधी पुन्हा एकदा चालून आली आहे. या विकासाचे शिलेदार होण्यासाठी सर्व बुथप्रमुखांनी आगामी काही दिवसांचा कालावधी पक्षासाठी घ्यावा, असे आवाहन निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी केले.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल बायपास रोड हॉटेल लक्ष्मी गार्डन येथे टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचा बुथ प्रमुखांचा विजय संकल्प बुथ प्रम



ुखांची बैठक संपन्न झाली. यावेळी बुथप्रमुखांना मार्गदर्शन करताना निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी बोलत होते. टाकळी ढोकेश्वर गटाच्या बैठकीत सरपंच प्रकाश गाजरे, चेअरमन नारायण झावरे साहेब, अशोक घुले, संदिप चौधरी, सरपंच आर. आर. राजदेव, उपसरपंच रामभाऊ तराळ, उपसरपंच रविंद्र गायखे, डॉ. बर्वे, सरपंच संजय रोकडे, अमोल उगले सरपंच अभी झावरे यांच्यासह निलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सरपंच प्रकाश गाजरे यांनी सांगितले की, विरोधकांकडे विकासाची दूरदृष्टी नाही. सांगण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नाही. केवळ अपप्रचार सुरू आहे. त्याला उत्तर देण्याची जबाबदारी तुम्हा - आम्हा सर्वांची आहे. याप्रसंगी टाकळी ढोकेश्वर गटातील प्रमुख पदाधिकारी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. या बैठकीला गटातील सर्व सरपंच व उपसरपंच व कार्यकर्त्यांसह अनेक गावच्या बुथ प्रमुखांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जाहीर...

शब्दाची संपत्ती लूटे
रे जाहीरनामे जाहीर
आश्वासने भरभरून
शब्दसम्राट ते माहीर

जोरात सुटले वादळ
मनात गोंगावे समीर
गरिबांच्या खांद्यावर
चढून बसलेत अमीर

रक्षण सक्षम रयतेचे
गर्जना करी रणवीर
मुठ होई खिळखीळ
तलवारीला पडे चीर

म्हणता बदलून टाकू
ती नशीबाची लकीर
नंतर जनता गा-हाणे
वाटू लागते कीरकीर

भिरे प्रचार झंझावात
मेंदू झिणझिणे बधीर
रे हृदया माया असह्य
उसळ्यां मारते रुधीर

जाहीर नामा निकामा
जेत्याला नसे फिकीर
सिंहासनाधिष्ट सम्राट
जनता संन्यासीफकीर

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## जगातली पहिली 'विश्वसुंदरी' काळाच्या पडद्याआड !



विश्वसुंदरी हा किताब पहिल्यांदा मिळवणाऱ्या किकी हॅकन्सन यांचं वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झालं आहे. १९५१ मध्ये किकी हॅकन्सन यांच्या डोक्यावर विश्वसुंदरी या बिरुदाचा मुकुट ठेवण्यात आला होता. जगातल्या पहिल्या विश्वसुंदरीने आज जगाचा निरोप घेतला आहे. कॅलिफोर्निया या त्यांच्या घरात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

**किकी हॅकन्सन यांचं वयाच्या ९५ व्या वर्षी निधन**

किकी हॅकन्सन यांचा मृत्यू झोपेतच झाला. त्या त्यांच्या कॅलिफोर्निया येथील घरी होत्या. त्यांच्या कुटुंबाने सांगितलं की, किकी हॅकन्सन यांना ४ नोव्हेंबरच्या रात्री झोपेत असतानाच देवाज्ञा झाली. त्यांच्या मृत्यूची घोषणा इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन करण्यात आली आहे.

**किकी हॅकन्सन यांनी रचला होता इतिहास**

किकी हॅकन्सन यांनी १९५१ मध्ये झालेल्या मिस वर्ल्ड या स्पर्धेत भाग घेतला आणि ही स्पर्धा त्या जिंकल्या. किकी हॅकन्सन यांनी जिंकलेल्या मिस वर्ल्ड या किताबामुळे या पुरस्काराची परंपरा जगात सुरु झाली. मिस वर्ल्ड हे या इन्स्टाग्राम अकाऊंटच्या पोस्टवरुन किकी हॅकन्सन यांना आदरांजली वाहण्यात आली आहे. आम्ही सगळे किकी हॅकन्सन यांच्या दुःखात सहभागी आहोत. आमचं प्रेम, सद्भवाना हे कायमच किकी हॅकन्सन यांच्या कुटुंबासह असेल अशी पोस्ट या पेजवरुन करण्यात आली आहे. किकी हॅकन्सन यांनी मिस वर्ल्ड हा किताब जिंकण्याआधी मिस स्वीडन हा किताबही जिंकला होता.

**किकी हॅकन्सन यांच्या मुलाने काय म्हटलं आहे?**

किकी हॅकन्सन यांचा मुलगा ख्रिस अँडरसन यांनी म्हटलं आहे माझी आई आज जगात नाही, ती खूप दयाळू, प्रेमळ आणि एखाद्या मैत्रिणीप्रमाणे होती. तिची विनोदबुद्धी खूप चांगली होती तसंच ती अत्यंत मोठ्या मनाची होती. तिने जे संस्कार आमच्यावर केले आहेत त्यामुळे आम्हाला कायमच तिची आठवण येत राहिल.

**जुलिया मॉर्ले काय म्हणाल्या?**

मिस वर्ल्ड स्पर्धेच्या अध्यक्षा जुलिया मॉर्ले म्हणाल्या, किकी हॅकन्सन यांनी मिस वर्ल्ड हा किताब जिंकून इतिहास रचला. पहिल्या विश्वसुंदरी म्हणून त्या कायमच स्मरणात राहतील. आम्ही त्यांना विसरणं शक्य नाही. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे.

१९५१ मध्ये, पहिली मिस वर्ल्ड स्पर्धा एरिक मॉर्ले यांनी आयोजित केली होती. स्वीडनमधील विजेत्या किकी हॅकन्सन यांना बिकिनीमध्ये मुकुट घालण्यात आला होता. १९५१ मध्ये पहिल्या 'मिस वर्ल्ड' सौंदर्य स्पर्धेतील स्पर्धकांनी 'बिकिनी' परिधान केली होती. त्याचीही चर्चा त्या काळात झाली होती.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

बुलडाणा, गुरुवार, दि.०७ नोव्हेंबर २०२४

संमिश्र

# थोडक्यात

## पळशीच्या जळीतग्रस्त कुटुंबांना मिळाला संगमनेरचा आधार

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील पळशी या दुर्गम भागातील राहणाऱ्या संगीता जनार्दन मधे व शांताबाई चिमा मधे या दोन आदिवासी कुटुंबांच्या झोपड्यांना ऐन दिवाळीच्या धामधुमीत आग लागून संसार उपयोगी साहित्य खाक झाल्या, यामुळे दोन्ही कुटुंबांचे संसार उघड्यावर आले होते. घटनेची माहिती समजताच सरपंच प्रकाश राठोड यांनी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना या घटनेची माहिती देण्यात आली व या आदिवासी कुटुंबाला आर्थिक मदत व जीवनावश्यक वस्तूंची मदत करण्याचे आवाहन केले होते. या घटनेची माहिती संगमनेर तालुक्यातील आधार फाउंडेशनला समजताच नुकतीच त्यांनी संसारोपयोगी साहित्य, किराणा व शैक्षणिक साहित्य आदींची मदत केली. पळशी येथिल संगीता जनार्दन मधे आणि शांताबाई चिमा मधे या आदिवासी महिलांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी शेतमजूरी करत आहेत. ऐन दिवाळीच्या काळात त्यांच्या झोपड्यांना अचानक आग लागून खाक झाल्या. यामुळे मोठे आभाळच कोसळले. याची माहिती आधार फाउंडेशनचे शिलेदार तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक मृणाल पवार यांनी तत्काळ आधार फाउंडेशनला दिली. त्यानंतर समन्वयक सोमनाथ मदने, शिलेदार श्रीकांत बिडवे, सुनील जाधव, गणेश वैद्य, तान्हाजी वाजे हे सर्वजण संसारोपयोगी साहित्य,धान्याचा कट्टा, महिनाभर पुरेल इतका किराणा, दोन विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व शैक्षणिक साहित्य, अंथरूण - पांघरूण, महिला भगिनींना साड्या ही मदत घेऊन दोन्ही कुटुंबांना सुपूर्द केली. याप्रसंगी सरपंच प्रकाश राठोड, मेंढपाळ कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष गणेश हाके, सामाजिक कार्यकर्ते संपत जाधव, गणेश शिंदे, उपसरपंच नवनाथ आगविले, ग्रामपंचायत सदस्य नितीन जाधव, विकास हिंगडे, जगन्नाथ देवकर, बाळासाहेब शिंदे, नामदेव दुधवडे आदी उपस्थित होते. दरम्यान, प्रकाश राठोड मित्रमंडळाच्या वतीने या कुटुंबियांना गरजेच्या भेटवस्तू देण्यात आल्या. या मदतीसाठी आधारचे समन्वयक डॉ.महादेव अरगडे, विठ्ठल कडूसकर, सुखदेव इल्हे, संतोष भुजबळ आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नांदेड :** लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या या दिवशी बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट अँड फेअर अॅक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी नांदेड जिल्ह्यांत्तही ८३-किनवट, ८४-हदगाव, ८५-भोकर, ८६-नांदेड उत्तर, ८७-नांदेड दक्षिण, ८८-लोहा, ८९-नायगाव, ९०-देगलूर व ९१ -मुखेड या ९ विधानसभा मतदार संघात बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. याअनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहेत.

बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या गावांची ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. तालुका हदगाव-मनाठा, किनवट-माळ बोरगाव, मांडवी, माहूर-मौ.दहेगाव, अर्धापूर-कामठा, धर्माबाद-निरंक, नायगाव-सोमठाणा, देगलूर-शहापूर, मरखेल, बिलोली-सगरोळी, मुखेड-जाहुर, दापका गु. , सावरगाव पिर, नांदेड- मौ. वाडी अंतर्गत छत्रपती चौक ते डी मार्टपर्यंत , मौ. तरोडा बु. व खु (तरोडा नाका), मुदखेड-निरंक, भोकर-निरंक, हिमायतनगर-हिमायतनगर शहर, उमरी-निरंक, लोहा-सोनखेड, उमरा, कंधार-मौ. बारुळ या ठिकाणची आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार २१ नोव्हेंबर २०२४ रोजी भरविण्यात यावेत. तसेच मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी परिसरात आठवडी बाजार भरत असल्यास याच आदेशान्वये ते बंद करण्यात येत असून हे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावेत असे आदेश निर्गमित केले आहे.

## रोख रक्कम व प्रतिबंधित पदार्थाच्या जप्तीच्या कार्यवाहीसाठी समिती गठीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, धाराशिव :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने निवडणूकविषयक कामे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विविध कक्ष गठीत करण्यात येत आहे.त्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेले फिरते गस्त पथक व स्थिर सर्वेक्षण पथक यांच्याकडून रोख रक्कम,मद्य,मादक पदार्थ व अमली पदार्थ ताब्यात घेण्यात येत आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या बाबीबाबतची तपासणी करून जप्तीची कार्यवाही करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी व तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी समिती गठीत केली आहे. समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,उपाध्यक्ष जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव तर सचिव म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी सचिन इगे,जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती अर्चना नरवडे,जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक चिन्मय दास,राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे व पोलीस निरीक्षक अमोल भुजबळ यांचा समावेश करण्यात आला आहे.

## वयोवृद्ध व दिव्यांग मतदारांचे घरीच मतदान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, यवतमाळ :** वय वर्ष ८५ वरील मतदार व दिव्यांग मतदारांना घरीच मतदान करता येणार आहे. यवतमाळ विधानसभा मतदारसंघात दि.१४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान मतदान पथकाद्वारे सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान पोस्टल बॅलेट पद्धतीने मतदान घेण्यात येणार आहे. यवतमाळ विधानसभा मतदार संघातील वय वर्षे ८५ वरील मतदार व दिव्यांग मतदार मतदारांच्या घरी जावून दि.१४ ते १६ नोव्हेंबर पर्यंतच्या कालावधीत संबंधित नियुक्त मतदान पथकाद्वारे सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान पोस्टल बॅलेट पध्दतीने मतदान प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

ज्या मतदारांनी नमुना १२ डी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत या सादर केले आहे. त्या यवतमाळ विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी वरील कालावधीत अर्जात नमुद केलेल्या पत्यावर उपस्थित राहुन आपल्या मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन यवतमाळच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे.

## पावसाळी सुट्टी संपवून माथेरानच्या राणीची दिमाखात सुरुवात; पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०६, माथेरान :** नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन प्रवासी वाहतूक दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ पासून सुरू झाली. सुट्टीनंतर मिनी ट्रेनची शिट्टी, धुर पुन्हा आकाशात पसरला, तब्बल २० दिवस उशिराने ही सेवा सुरू झाली. दरम्यान पहिल्या प्रवासी गाडीतून ८८ प्रवाशांनी प्रवास केला.

आठवड्यातून नेरळ माथेरान नेरळ मार्गावर केवळ ८ गाड्या चालवल्या जाणार आहेत. मात्र पर्यटकांनी पहिल्या दिवशी गर्दी करून मिनी ट्रेन बाबतचे आकर्षण दाखवून दिले. पर्यटकांची सर्वाधिक लोकप्रिय असणारी माथेरानची राणी मिनीट्रेनची नेरळ प्रवासी वाहतूक बुधवार, दिणक ०६ नोव्हेंबर २०२४ रोजी सूरू झाली आहे. सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी नेरळहून निघालेल्या पहिल्या मिनिट्रेन मधून ८८ प्रवाशांनी प्रवास केला.



पहिली मिनी ट्रेन १० वाजून ४५ मिनिटांनी माथेरान स्थानकात पोहचली. मिनि ट्रेनला सुरुवात होत असल्याने पर्यटकांचा उदंड प्रतिसादामुळे मिनी ट्रेन फुल झाली होती. या गाडीची द्वितीय श्रेणीची सर्व म्हणजे ७२ तिकडे संपली होती. त्यात प्रथम श्रेणीची सर्व १६ तिकिटे बुक झाली होती. नेरळहून माथेरान पर्यंत चालवण्यात आलेल्या या मिनी ट्रेनला आज मात्र पाहिल्याच दिवशी पर्यटकांचा भरभरून प्रतिसाद मिळाल्याने १२ हजार ८४० महसूल प्राप्त झाला.

> आम्ही काल माथेरानला येऊन गेलो. नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन सूरू होणारं म्हणून आम्ही आज पहिल्या मिनी ट्रेनची सफर केली. अत्यंत आनंददायी निसर्गाचं मनमोहक दर्शन अनुभवता आली. लहानपणाची झूक झूक गाडी पुन्हा अनुभवता आली.
>
> **नलिनी ओढे पर्यटक (पुणे)**

दिनांक १५ जून रोजी नेरळ माथेरान नेरळ ची प्रवासी सेवा सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून नेहमीप्रमाणे बंद करण्यात आली होती. मात्र शटल सेवा पावसात देखील सुरू होती. पावसाळ्यात सुट्टीवर असणारी मिनी ट्रेनची नेरळ माथेरान नेरळ सेवा दरवर्षी १६ ऑक्टोबरला सुरू होते. परंतु यावर्षी ही सेवा २० दिवस उशिराने म्हणजेच ०६ नोव्हेंबर रोजी सुरू झाली. एन.डी.एम -४०५ हे इंजिन लावलेल्या मिनी ट्रेनला एक प्रथम श्रेणी तर तीन द्वितीय श्रेणी एक गार्ड बोगी ते एक लगेज बोगी असे. ६ डबे लावण्यात आले होते.

नेरळ माथेरान नेरळ असे ४ फेऱ्या या दररोज सुरू असतील. पावसाळी सुट्टी नंतरच्या पर्यटन हंगामाची सुरुवात होत असलेली मिनी ट्रेनच्या पहिल्या गाडीचे चालक पी.के निराळा या गाडीसाठी तिकीट तपासणी म्हणून अनुभवी भगत, गाडीचे लोको पायलट भानुदास ठाणगे यांच्या हस्ते श्री फळ वाढवून पूजा करण्यात आली. यावेळी असिस्टंट लोको पायलट लक्ष्मण हाबळे, ट्रेन मॅनेजर सचिन पाटील, संजय भगत, रामदास कडव, सुनिल शेळके, पप्पू कुमार हरीश चिंचोले, ब्रेक पोर्टर स्टाफ इलेक्ट्रिशन, माथेरान स्टेशनचे प्रबंधक विनय कुमार, पर्यटक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींना पोस्टाचा 'सासुरवास'

### केवायसी करण्यासाठी बहिणींच्या चपला झिजल्या; ९ ते ११ च होत आहे लाडकी बहिण योजनेचे काम

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०६, खोपोली (रायगड) :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारने राज्यातील कोट्यवधी बहिणींना सबल करण्याच्या उदात्त हेतुने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजना सुरू करीत दरमहा १ हजार ५०० रूपये दिले. या योजनेसाठी कोट्यवधी महिलांनी अर्ज सादर केले. मात्र, अनेक महिलांच्या बँक खात्याची केवायसी झालेली नसल्याने त्याच्या खात्यात पैसे येवूनही आज पण अनेक महिलांना 'लाडकी बहिण' योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही.




सरकारी व खासगी बँकांमध्ये खात्याची केवायसी नसल्यास रांगेत उभे राहून करून घेता येते. परंतु महिलांचा सर्वाधिक छळ पोस्टाकडून सुरू असल्याचे दिसून येत आहे. टार्गेट पूर्ण करण्याच्या उद्देशाने काही वर्षापूर्वी १०० रूपये घेत लोकांचे आयपीबीबी (IPBB) खाते उघडण्यात आले होते. यात अनेक महिलांचे खाते उघडण्यात आले व आता याच खात्यात 'लाडकी बहिण' योजनेचे पैसे जमा झाले आहेत. परंतु यातील अनेक खाते उपयोगात नसल्याने त्यांची 'केवायसी' करावी, असे सांगण्यात आले. मात्र, पोस्ट विभागातील कर्मचाऱ्यांकडून लाडक्या बहिणींचा मोठ्या प्रमाणावर छळ सुरू असल्याचे दिसून येत आहे. केवायसी करण्यासाठी ८ ते १० किंवा ९ ते ११ असा दोन तासांचाच वेळ दिला जात असल्याने अनेक जण मागील महिन्याभरापासून पोस्टात चकरा मारत आहेत. पनवेल येथील हेड पोस्ट ऑफीसमधील कर्मचारी तर नागरिकांवर उपकार करीत आहेत. असेच वागत आहेत. दिवसभर टाईमपास केला जातो मात्र ११ वाजेनंतर आलेल्या महिला व बँक ग्राहकांना अक्षरशः हाकलून दिले जाते. हिच परिस्थिती खोपोली शिळफाटा येथील पोस्ट ऑफीसमध्ये देखील दिसून येते. केवायसी करण्यासाठी दिवसभर काऊंटर का सुरू करण्यात येत नाही? असा प्रश्न महिलांकडून विचारला जात आहे.

खोपोली, खालापूर, पनवेलसह राज्यभरातील पोस्ट विभागातील कर्मचारी लाडक्या बहिणींचा अक्षरशः छळ करीत असल्याचे दिसून येत आहे. तासन्तास रांगेत उभे राहूनही केवायसी केली जात नाही. महिलांना अतिशय घाणेरडी वागणूक या शासकीय कार्यालयात दिली जात आहे. अनेक अधिकारी व कर्मचारी स्वत:ला पोस्टाचे मालक समजून महिलांना तुच्छतेची वागणूक देत असल्याचे दिसून येत आहे.

भाकर नको, कुत्रा आवर... अशी म्हणण्याची वेळ अनेक लाडक्या बहिणींवर आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील मंत्री, आमदार, खासदार, निवडणूक आयोग, पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधिकारी महिलांची होणारी ही पिळवणूक थांबविणार का? महिलांचे खाते सुरू होवून त्यांना 'लाडकी बहिण' योजनेचा लाभ मिळेल का? केवायसीसाठी सुरू असलेली त्रेधातिरपीट थांबणार का? असा प्रश्न महिलांकडून उपस्थित केला जात आहे.

## विशेष निवडणूक निरीक्षकांनी घेतला निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, ठाणे :** येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले विशेष निवडणूक निरीक्षक (निवडणूक खर्च) बी.आर. बालकृष्णन यांनी बुधवार, दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत निवडणूक तयारीचा आढावा घेतला. ठाणे हा राज्यातील महत्वाचा जिल्हा असल्याने सर्व १८ विधानसभा मतदारसंघातील निवडणूका शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सतर्क राहून समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या.

या बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त दत्ता शिंदे, ठाणे (ग्रामीण) पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी,१८ विधानसभा निवडणूक मतदारसंघांसाठी नियुक्त केलेले केंद्रीय खर्च निरीक्षक आशिषकुमार पांडेय, रविंदर सिंधू, सुरेंद्र पाल, जी मनीगंडासामी, जिल्हा समन्वय अधिकारी, नोडल अधिकारी आदी उपस्थित होते.

या बैठकीत विशेष निवडणूक निरीक्षक बी.आर. बालकृष्णन यांनी निवडणूक प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा घेतला. तसेच पोलीस, एसएसटी, एफएसटी, राज्य उत्पादन शुल्कामार्फत आतापर्यंत करण्यात आलेली कारवाई याबाबतची माहितीही त्यांनी घेतली. तसेच त्यांना सतर्क राहण्याच्या सूचनाही दिल्या.

ठाणे जिल्ह्यातील सर्व तपासणी नाक्यांवर आतापर्यंत केलेल्या कारवाईत सापडलेला अवैध मद्यसाठा, तसेच अनधिकृतपणे ने-आण करण्यात असलेल्या रोख रक्कम याबाबतचा आढावा देखील त्यांनी घेतला. तसेच आतापर्यंत जी कारवाई करण्यात आलेली आहे त्याचा डेटाबेस तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. त्याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यात बाहेरच्या जिल्ह्यातून गोवा, दमण येथून अवैधरित्या येत असलेला मद्यसाठा, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण, उल्हासनगर येथील हातभट्ट्यावरून होणारी मद्याची अवैध विक्री याबाबतचा आढावा घेत असताना कारवाई दरम्यान ड्रोनचा वापर करावा, असेही त्यांनी नमूद केले. तसेच रेल्वे स्टेशनवर सुरू असलेल्या तपासणीचा आढावा घेत असताना रेल्वेमधून प्रवास करणाऱ्या व संशयास्पदरित्या आढळणाऱ्या प्रवाशांची



देखील तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

विशेष निवडणूक निरीक्षक बी.आर बालकृष्णन यांनी एकूणच जिल्ह्यात विविध पथकांनी केलेल्या कामकाजाचा आढावा घेत असतानाच सी-व्हीजीलवर प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण याबाबतची माहिती जाणून घेतली. विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीपच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करावी, असेही त्यांनी सूचित केले.

मतदानासाठी काहीच दिवस शिल्लक असून सर्वांनी २४ तास सतर्क राहून पूर्ण क्षमतेने काम करावे व संपूर्ण मतदान प्रक्रिया उत्साही वातावरणात सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी उपस्थितांना दिल्या.

## मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉईंटचे उद्घाटन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नांदेड :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा मुख्यालयाच्या बाजुला रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालयात जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या सहयोगाने मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंटचे उद्घाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

मतदाराला प्रोत्साहन म्हणून मतदानाच्या बोटाची शाई दाखवा आणि मोफत डोळे तपासणी करून घ्या




असा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी मोठया प्रमाणात मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. आज वाचनालयाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागात व लसीकरण केंद्रात रुग्णाला दिल्या जाणाऱ्या पावती व औषधाच्या कागदावर मी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मी मतदान करणार तुम्ही पण करा असा एक शिक्का देण्यात येत आहे. याप्रसंगी नांदेड महानगर पालिका उपायुक्त अजितपाल सिंग संधू, शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी , जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच के साखरे, स्वीप ८६ नांदेड उत्तरचे संभाजी पोकले व सुनिल मुत्तेपवार व रुग्ण सेवा मंडळाचे सहसचिव प्रा. डॉ. बालाजी कतूरवार यांच्यासह वाचक, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

